# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४०००१

दुरध्वनी : ०७१२-२५२२७०६ फॅक्स : ०७१२-२५५५७०१


क्रमांक : रातुमनावि/साप्र/१६/स/२४५४

दिनांक : २१ नोव्हेंबर २०१६

प्रति,

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक.
३. विद्यापीठाशी संलग्नित नागपूर शहरातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.
४. विद्यापीठ वसतिगृहांचे सर्व अधीक्षक.

विषय : २६ नोव्हेंबर हा दिवस ‘संविधान दिन’ म्हणून साजरा करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, भारतीय संविधानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी ह्या दृष्टिने राज्य व केन्द्र शासनाच्या निर्देशानुसार **दिनांक २६ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथील प्रांगणात** विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने **संविधान दिनाचा कार्यक्रम** आयोजित करण्यात आला आहे.

प्रस्तुत कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नागपूर शहरातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे व विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी आपआपल्या महाविद्यालयाचा नामफलक व संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ह्या जीवन मूल्यांचा पुरस्कार करणारी घोषवाक्य असणारे फलक घेऊन संविधान चौकात (रिजर्व बॅक चौकस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ) सकाळी ८.३० वाजता एकत्र येतील व संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाला माल्यार्पण व अभिवादन करून मिरवणुकीद्वारे विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयाच्या प्रांगणात येवून आसनस्थ होतील. याप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलगुरू, प्र–कुलगुरू आणि कुलसचिव यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार असून त्यांची सविधानावर भाषणे होणार आहेत, त्यानंतर संविधान प्रास्ताविकेचे वाचन होणार आहे.

करिता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील/विभागातील/ वसतिगृहातील **सर्व विद्यार्थ्यांना प्रस्तुत कार्यक्रमास दिनांक २६ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी ८.३० वाजता संविधान चौक** (रिजर्व बॅक चौकस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ) **येथे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.**

आपला

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव:

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.

यांना विनंती करण्यात येते की, वरील आयोजित कार्यक्रमास आपल्या अधिपत्याखालील सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना **दिनांक २६ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता** विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील (मुख्य प्रशासकीय कार्यालय) **प्रांगणात** उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व आपण देखील कार्यक्रमास उपस्थित राहावे.

(प्रदीप मसराम)
उपकुलसचिव (सा.प्र.)
(अति. प्रभार)